## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला ई ब्लॉक , सी २२,बांन्द्रा कुर्ला संकुल, बांन्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ— www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा. क्र./नोंदणी- नुतनीकरण/प्र.क्र.१६४/आस्था-०२/ २०२२/2441 (अ) दिनांक- 09/11/2022

प्रति,

१. अप्पर कामगार आयुक्त, नागपूर/ मुंबई/पुणे
२. कामगार उप आयुक्त,मुंबई शहर/मुंबई उपनगर पूर्व/मुंबई उपनगर पश्चिम/ठाणे/ नाशिक/औरंगाबाद/ रायगड/ पालघर/ अमरावती
३. सहाय्यक कामगार आयुक्त,कल्याण/ भिंवडी/अकोला/भंडारा/गोंदीया/ सांगली/सातारा/ कोल्हापूर/इचलकरंजी/ लातूर/अहमदनगर/जळगांव/ नांदेड/सोलापूर/ रत्नागिरी/ चंद्रपूर
४. सरकारी कामगार अधिकारी, वाशिम/वर्धा/तुमसर/गडचिरोली/बुलडाणा/ बार्शी/ बीड/ उस्मानाबाद/ धुळे/ नंदुरबार/ यवतमाळ/ मालेगांव/ जालना/ सिंधुदूर्ग/हिंगोली/ परभणी

विषय :- बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणात वाढ करण्याबाबतच्या उपाययोजनांना मान्यता देणेबाबत

संदर्भ :- कक्ष अधिकारी यांचे पत्र क्र.इबांका ११२२/प्र.क्र.१८९/काम-७ दि.०९.११.२०२२

संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

१. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम १२ (३) मध्ये नोंदणी शुल्काबाबतची तरतूद आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण करण्याच्या शुल्काच्या सद्यस्थितीतील रक्कमेत बदल करून सदर शुल्काची रू.०१/- इतकी ठेवावी.

२. बांधकाम कामगाराचा नोंदणी/ नुतनीकरण अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या

दिनांकापासून नोंदणी/ नुतनीकरणाची वैधता एका वर्षाची ठेवण्यात यावी.

३. नोंदणी अधिकाऱ्याच्या कार्यालयातील लिपीकांना आवश्यकतेनुसार लॉग इन आयडी वाढवून देण्याची कार्यवाही सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने करण्यात यावी.

४. IWBMS संगणक प्रणालीमधील लॉग इन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करण्यात यावी.

५. बांधकाम कामगाराच्या नोंदणी/ नुतनीकरणासाठीच्या अर्जासोबत सादर केलेल्या माहितीबाबत स्पष्टीकरणाकरीता (Clarification) बांधकाम कामगाराकडे परत पाठविण्यात आलेल्या अर्जाच्या बाबतीत संबंधित बांधकाम कामगाराने ०७ दिवसात स्पष्टीकरण सादर करावे. बांधकाम कामगारांकडून विहीत मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. याबाबत संबधित कामगारास मोबाईलवर एस.एम.एस. पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी जिल्हा सुविधा केंद्र निहाय आवश्यक मनुष्यबळ पुरविणेबाबत मे. आय.टी. आय. प्रा.लि. व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थांना कळविण्यात यावे. परंतु, या कामासाठी सदर संस्थेसोबत केलेल्या करारामध्ये नमूद केलेल्या मनुष्यबळापेक्षा अतिरिक्त मनुष्यबळ लावावे लागत असल्यास त्याबाबत कोणताही अतिरिक्त आर्थिक भार मंडळावर येणार नाही, याची दक्षत घ्यावी.

७. बांधकाम कामगारांचे प्रलंबित नोंदणी/ नुतनीकरणाबाबतचे अर्ज दि.१५ डिसेंबर, २०२२ पर्यंत तातडीने निकाली काढण्याबाबत सर्व नोंदणी अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रत :-

१. मा. प्रधान सचिव, कामगार, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मे. आय.टी. आय. लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांना माहिती उचित कार्यवाहीस्तव